मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 4 मार्च 2025 | पान- 1

# आळंदी नगरपरिषदेचा 89.51 कोटींचा अर्थसंकल्प

## तृतीय पंथीयांच्या कल्याणासाठी तरतूद करणारी पहिली नगरपरिषद

**पिंपरी | प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या आळंदी नगरपरिषदेचा यंदाच्या वर्षीचा आर्थिक वर्षाचा ६.६५ लाख इतक्या शिलकीसह ८९.५१ कोटींचा अर्थसंकल्प प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी सादर केला. अर्थसंकल्पात कोणत्याही स्वरूपाची कर वाढ करण्यात आलेली नसून उल्लेखनीय बाब म्हणजे 'तृतीय पंथीयांच्या' कल्याणासाठी अर्थसंकल्पात 3% तरतूद करण्यात आली आहे. अश्या स्वरूपाची तरतूद करणारी आळंदी नगरपरिषद ही क वर्ग स्तरावरिल राज्यातील पहिली नगरपरिषद आहे.




### अर्थ संकल्पिय जमा खर्चाचा तपशील

- » आरंभीची शिल्लक - ३,६२.०२० रूपये.
- » महसूली जमा - २७,७९, ००,००० रूपये
- » भांडवली जमा - ६१,६८,५०,००० रूपये
- » एकूण जमा - ८९, ४७,५०,००० रूपये.
- » आरंभीच्या शिलकेसह एकूण जमा ८९,५१,१२,०२० रूपये.
- » खर्चाचा तपशील -
- » महसूली खर्च - २७,५८,०७,००० रूपये.
- » भांडवली खर्च - ६१,८६,४०,००० रूपये.
- » एकूण खर्च - ८९,४४,४७,००० रूपये.
- » शिल्लक जमा खर्च - ६,६५,०२० रूपये.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ व महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता २०१३ चे नियम क्रमांक ४०४ ते ४३१ अन्वये आळंदी नगरपरिषद प्रशासक नात्याने मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह २०२५-२६ चे नियमित अंदाजपत्रक सादर केले. अर्थसंकल्पात महिला, बालक, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, तृतीय पंथीयांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे आळंदी शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी नवीन पाण्याच्या टाक्या उभारणी, अंतर्गत वितरण नलिका टाकणे व इतर अनुषंगिक बाबींसाठी निधीची भरीव तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तसेच शहरात नवीन तीन उद्यान निर्माण करणे, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणे, नगरपरिषद शाळांचे इमारत बांधकाम, त्यांचे नुतनीकरण, संगणकी करणं यांच्यासह दर्जावर्धन करणे, शहराची वाढती लोकसंख्या आणि विस्तार लक्षात घेवून सुधारित भुयारी गटार योजना, एस टी पी प्रकल्प, देहू फाटा ते मरकळ बायपास रस्ता, आळंदी नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारत उभारणी इत्यादी बाबींवर अर्थसंकल्पात भर देवून भरीव निधीची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती आळंदी नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी दिली.

**अर्थ संकल्पाची वैशिष्ट्य -**

तृतीय पंथीयांच्या कल्याणासाठी ३% तरतूद. अशी तरतूद करणारी राज्यातील पहिली नगरपरिषद

ज्येष्ठ नागरिक कल्याणासाठी ३% तरतूद

दिव्यांग कल्याणासाठी ५% तरतूद.

महिला व बालकांच्या कल्याणासाठी ५% तरतूद

मागास प्रवर्गातील नागरिकांच्या कल्याणासाठी ५% तरतूद

शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ५ कोटींच्या भरीव निधीची तरतूद

आळंदी नगरपरिषदेच्या शाळांच्या नूतनीकरणासाठी ३ कोटींची तरतूद

शहराची गरज लक्षात घेवून भुयारी गटार योजनेसाठी भरीव निधीची तरतूद

शहरात नवीन ३ उद्याने निर्माण करण्यासाठी निधीची तरतूद

आळंदी नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी भरीव निधीची तरतूद

# नाशिक फाटा ते लांडेवाडी प्लेगेथॉन स्वच्छता मोहीम

## पुणे प्लॉगर्स, मानवी हक्क संरक्षण जागृती आणि इतर संस्थांनी तीन टन कचऱ्याचे संकलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि पुणे प्लॉगर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक फाटा ते लांडेवाडी चौक, राष्ट्रीय महामार्गाच्या जवळपास अडीच किलोमीटरपर्यंत ‘प्लेगेथॉन’ आयोजित करण्यात आली होती. उपायुक्त सचिन पवार यांच्या उपस्थितीत हा उपक्रम राबविण्यात आला. आरोग्य विभाग आणि बेसिक्स टीमकडून गेल्या काही दिवसांपासून जनजागृती



स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, यापुढेही यासाठी सतत प्रयत्न केले जातील. असे मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी यांनी सांगितले. पुणे प्लॉगर्स, मानवी हक्क संरक्षण जागृती, आणि इतर संस्थांनी तीन टन कचऱ्याचे संकलन केले. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, बाटल्या आणि घनकचरा होता. यावेळी जयश्री आरणे यांनी ‘माझी वसुंधरा’ शपथ दिली.

या कार्यक्रमात प्रभागाचे क्षेत्रीय अधिकारी महेश वाघमोडे, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, सहायक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मानवी हक्क संरक्षण जागृतीचे अण्णा जोगदंड अनेक मान्यवर उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे स्वच्छता ब्रँड ॲम्बेसिडर आदिती निकम, सुरेश डोळस, पुणे प्लॉगर्स फाउंडर विवेक गुरव, आणि इतर विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहरातील रस्त्यांवर 4 हजार बेवारस वाहने

## 15 दिवसांत सर्व वाहने हटवली जाणार : वाहतूक विभाग आणि महापालिकेकडून संयुक्त कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवर चार हजार बेवारस वाहने असून, येत्या १५ दिवसांमध्ये येथील सर्व बेवारस वाहने हटवली जाणार आल्याची माहिती अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली आहे. कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या ‘स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियाना’च्या माध्यमातून गणेश पेठेतील दूधभट्टी चौकामध्ये बेवारस वाहने हटविण्याच्या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., झोन एकचे पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल, कसबा मंडल अध्यक्ष राजेंद्र काकडे यांच्यासह कसबा मतदारसंघातील सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



शहरात जवळपास चार हजारांवर धूळ खात पडलेली बेवारस वाहने आहेत. यामुळे पार्किंगची समस्या वाढत असून, आरोग्यावरही परिणाम होतो. यातील काही वाहने चोरीची असतात, तर काहींचे मालक सापडत नाहीत. पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार या प्रकारच्या वाहनांच्या मालकांना प्रथम नोटीस दिली जाईल. मात्र, कोणी मालक नसल्यास वाहतूक पोलीस गाड्या जप्त करतील आणि पुढे कायदेशीर प्रक्रिया करून लिलाव केला जाईल, असे मनोज पाटील यांनी सांगितले.

कसबा मतदारसंघात पहिल्या दिवशी १३९ वाहने उचलण्यात आली आहेत. महापालिकेच्या माध्यमातून रस्त्यावर धूळ खात पडलेली ४५ वाहने गेल्या महिन्यात उचलण्यात आली आहेत. महापालिका आणि पोलीस यांच्यामध्ये समन्वय साधून ही कारवाई केली जात आहे. दोन्ही विभागांकडून रस्त्यावर अशा पद्धतीने वाहने उभी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते. वाहने जप्त केल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पार पडण्यासाठी काही महिने लागत असल्याने ती ठेवण्यासाठी बाणेर येथे महापालिकेची जागा असून, कोंढव्यात नवीन जागा उपलब्ध करून देण्यात येईल. खराब झालेल्या महापालिकेच्या वाहनांचादेखील लवकरच लिलाव केला जाणार आहे, असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

> “ रस्त्यावर कचरा तसेच बेवारस साहित्य असू नये, हा प्रयत्न आहे. त्यामुळे अशी वाहने उचलण्यासाठी पुणे पोलीस, वाहतूक विभाग आणि महापालिकेच्या संयुक्तिक कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. कसबा अनधिकृत फ्लेक्समुक्त करण्यासाठी देखील प्रयत्न सुरू आहेत.
>
> - हेमंत रासने (आमदार)

# शिक्षणाबरोबरच खेळांची आवड जोपासणे गरजेचे - हर्षवर्धन पाटील

## 'युवोत्सव 2025' मध्ये पीसीसीओईआर, गरवारे, मॉडर्न महाविद्यालयांचा विजय

**पिंपरी | प्रतिनिधी**

जग झपाट्याने बदलत असून सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. विद्यार्थी दशेत शिक्षणाला महत्त्व आहे. परंतु अभ्यासाचे दडपण असेल तर त्याचा शरीरावर परिणाम होतो. मानसिक सुदृढतेसाठी शिक्षणाबरोबरच खेळांची आवड जोपासली पाहिजे. तरच तंदुरुस्त, खंबीर समाज निर्माण होईल. पालकांनीही याकडे जागरूकपणे पाहण्याची आवश्यकता आहे. सर्वांगीण विकास साधत देशाची भावी पिढी सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक यांची जबाबदारी आहे, असे मत पीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने ‘युवोत्सव २०२५’ या तीन दिवसांच्या क्रीडा स्पर्धेचा समारोप नुकताच पारितोषिक वितरण समारंभाने झाला. यावेळी हर्षवर्धन पाटील बोलत होते. यावेळी उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, एस. बी. पाटील मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर उपस्थित होत्या.

दरम्यान स्पर्धेचे उद्घाटन गुरूवारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, आरजे अक्षय यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत फुटबॉल, बॉक्स क्रिकेट, बॅडमिंटन आणि व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. पुणे जिल्ह्यासह सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील एकूण १४५ संघ सहभागी झाले होते.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल :**

फुटबॉल – प्रथम क्रमांक – गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, उपविजेते – श्री बालाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, आकुर्डी;

बॉक्स क्रिकेट (पुरुष) – प्रथम – डी. वाय. पाटील आयएमएस, आकुर्डी, उपविजेते – पीसीसीओई, निगडी, डी. वाय. पाटील कॉलेज, तळेगाव;

बॉक्स क्रिकेट (महिला) – प्रथम – पीसीसीओईआर, रावेत, उपविजेते – झील कॉलेज, इंदिरा कॉलेज;

बॅडमिंटन (पुरुष) – प्रथम – आनंद बोरा (एमआयटी स्कूल ऑफ डिस्टन्स एज्युकेशन), उपविजेते – रितेश निम्हाळ (पीसीसीओई, निगडी);

बॅडमिंटन (महिला) – प्रथम परिनीत मगदूम (बाबुरावजी घोलप कॉलेज, सांगवी), उपविजेते – अमृता गाडेकर (एमआयटी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय);

व्हॉलीबॉल – प्रथम मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर; उपविजेते – पीसीसीओई निगडी, के. बी. पी. सातारा

वैयक्तिक विजेते – बॅडमिंटन (पुरुष) – सर्वोत्तम स्मॅशर – आनंद बोरा (एमआयटी स्कूल ऑफ डिस्टन्स एज्युकेशन),; बॅडमिंटन (महिला) – सर्वोत्तम स्मॅशर मिहिका ठाकूर (एमआयटी स्कूल ऑफ डिस्टन्स एज्युकेशन);

बॉक्स क्रिकेट (पुरुष) – सर्वोत्तम फलंदाज – आदर्श पवार (डीवायपी आयएमएस); सर्वोत्तम गोलंदाज – प्रथमेश नाथे (पीसीसीओई), सर्वोत्तम क्षेत्ररक्षक – अभिषेक कोठावदे (डीवायपी आयएमएस);

बॉक्स क्रिकेट (महिला) – सर्वोत्तम फलंदाज – श्रेया टाकळकर (पीसीसीओईआर); सर्वोत्तम गोलंदाज – आदिती बिरादर (इंदिरा कॉलेज);

सर्वोत्तम क्षेत्ररक्षक – कल्याणी कोळपे (पीसीसीओईआर); व्हॉलीबॉल – सर्वोत्तम सेंटरर – विकास भामरे,

सर्वोत्तम ब्लॉकर – संस्कार पावरे, सर्वोत्तम स्मॅशर – विनीत शिंदे;

फुटबॉल – सर्वोत्तम गोलकीपर – ललित डोंगरा (श्री बालाजी), टॉप गोल स्कोरर – यश गटकळ (डीवायपी सीओई), सर्वोत्तम खेळाडू – प्रेम भयार (गरवारे).

# महापालिकेच्या शाळांत 'बोलक्या भिंती' उपक्रम

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देण्याचे उद्दिष्ट; शाळेच्या भिंतीवर रेखाटली रंगबेरंगी चित्रे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका शाळेच्या भिंती केवळ चार भिंती नसतात, तर त्या ज्ञान, सर्जनशीलता आणि प्रेरणांचा खजिना असतो. या भिंती आता 'बोलक्या भिंती' या उपक्रमामुळे बोलक्या झाल्या आहेत, ज्या विद्यार्थ्यांना शिकण्याची, विचार करण्याची आणि स्वतःच्या कल्पनांना रंग देण्याची संधी देत आहेत.

महापालिका शाळेच्या भिंती केवळ चार भिंती नसतात, तर त्या ज्ञान, सर्जनशीलता आणि प्रेरणांचा खजिना असतो. या भिंती आता 'बोलक्या भिंती' या उपक्रमामुळे बोलक्या झाल्या आहेत, ज्या विद्यार्थ्यांना शिकण्याची, विचार करण्याची आणि स्वतःच्या कल्पनांना रंग देण्याची संधी देत आहेत. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांची सर्जनशीलता विकसित व्हावी आणि शाळेचे वातावरण अधिक आनंददायी व्हावे हा या उपक्रमामागचा उद्देश आहे, असे मत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले.

महापालिकेच्या चिंचवड येथील मरहूम फकीरभाई पानसरे उर्दू प्राथमिक शाळेमध्ये आकांक्षा फाऊंडेशन व शाळा व्यवस्थापन समितीच्या १५ सदस्यांच्या सहकार्याने प्रायोगिक तत्वावर बोलक्या भिंती हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगिता बांगर, मुख्याध्यापक अब्दुस सलाम इनामदार, पर्यवेक्षिका हमिदा मोमीन, सुनंदा मगर यांच्यासह शाळेतील शिक्षक, आकांक्षा फाऊंडेशनचे प्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समितीमधील सदस्य तसेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

जांभळे पाटील म्हणाले की, बोलक्या भिंती उपक्रम हा केवळ शाळा सौंदर्यासाठी राबवण्यात येणार नसून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि सर्जनशील विकासासाठी हे एक महत्वाचे पाऊल आहे. भिंतींवरील विविध प्रेरणादायी संदेश, रंगसंगती, रेखाटने यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल आणि त्यांना विविध गोष्टी शिकण्यात अधिक आनंद मिळेल. पालकांचा सहभाग हा या उपक्रमाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे, कारण यामुळे शाळा आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ होईल. सध्या प्रायोगिक तत्वावर एका शाळेमध्ये हा उपक्रम राबवण्यात येत असून कालांतराने इतर महापालिका शाळांमध्येही हा उपक्रम राबवण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



### पालकांनी दाखवली सहभागाची तयारी

» बोलक्या भिंती उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः चित्रं काढून शाळेच्या भिंती रंगीबेरंगी केल्या आहेत. त्यामध्ये विविध प्रकारची निसर्गचित्रे, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांनी भिंतींवर रेखाटली आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ कलागुणच नव्हे, तर एकत्रित काम करण्याची भावना निर्माण झाली आहे. याशिवाय शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना रंगसंगती, रेखाटन आणि भिंतींवर चित्रे काढण्याच्या तंत्राचे प्रशिक्षणदेखील देत आहेत. यामध्ये त्यांना आकांक्षा फाऊंडेशनच्या सदस्यांचीही मदत लाभत आहे. या उपक्रमामध्ये पालकांनाही सहभागी करून घेण्या येत असून शाळेच्या भिंती सुंदर झालेल्या पाहून पालकांनीही आनंद व्यक्त केला आहे. तसेच काही पालकांनी या उपक्रमासाठी शाळेला सहकार्य करण्याची तयारीसुद्धा दर्शवली आहे.

> 'बोलक्या भिंती' हा उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षणच नव्हे, तर त्यांच्या सर्जनशीलतेलाही चालना मिळेल. चित्रे, विविध माहितीपर मजकूर आणि आकर्षक रंगसंगतीमुळे मुलांच्या कल्पकतेला अधिक चालना मिळेल. या उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाच्या पद्धतीत एक सकारात्मक बदल घडून येईल आणि मुलांमध्ये शाळेबद्दल आकर्षण निर्माण होण्यास मदत मिळेल.
>
> -विजयकुमार थोरात, सहाय्यक आयुक्त, शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

> 'बोलक्या भिंती' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांना शिकण्याची नवी प्रेरणा मिळेल. चित्रांच्या आणि रंगसंगतींच्या माध्यमातून मुलांना अवघड संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगता येतील. शिवाय, शाळेचे वातावरण अधिक प्रेरणादायी आणि आनंदी राहील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत यायला अधिक उत्साह वाटेल. अभ्यासाबरोबरच कला, सर्जनशीलता आणि नवकल्पनांना वाव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.
>
> -सलाम इनामदार, मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, चिंचवड

# निगडीत मिनी ऑलिम्पिक धर्तीवर साकारणार क्रीडा संकुल

## निगडी प्राधिकरणातील सेक्टर 25 येथील मदनलाल धिंग्रा मैदानाचे रुप पालटणार, महापालिका विविध खेळांसाठी या मैदानात नवीन क्रीडा संकुल उभे करणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी प्राधिकरणातील सेक्टर २५ येथील मदनलाल धिंग्रा मैदानाचे रुप पालटणार आहे. महापालिका विविध खेळांसाठी या मैदानात नवीन क्रीडा संकुल उभे करणार आहे. त्यामुळे अत्याधुनिक सुविधायुक्त मिनी ऑलिम्पिक धर्तीवर हे क्रीडा संकुल हौशी, उदयोन्मुख व स्पर्धक खेळाडूंसाठी दिलासा ठरणार आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या मैदानात तीन बॅडमिंटन कोर्ट आहेत. तसेच जॉगिंग ट्रॅक आणि मोकळे खेळाचे मैदान, असे एकूण मैदानाचे क्षेत्रफळ ५.४ एकर आहे. सकाळी व संध्याकाळी नागरीक व्यायामासाठी तसेच खेळाडू या मैदानावर सरावासाठी येत असतात. तसेच क्रिकेटचे सामनेही येथे भरविण्यात येतात. हे नवीन क्रीडा संकुल बांधण्याचा खर्च अंदाजे २३ कोटी ४० लाख रुपये असणार आहे. दोन वर्षात काम पूर्ण करण्याची महापालिका प्रशासनाची अट आहे.




### प्रस्तावित क्रीडा संकुल

» तीन मजली नवीन इमारत, पार्किंग व लिफ्ट सुविधा (२१८ चौ. मी) असणार आहे. इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सेमी ऑलिम्पिक आकाराचा अत्याधुनिक सात लेनचा डेकसह जलतरण तलाव तयार करण्यात येणार आहे. कार्यालय, क्रीडा वैद्यकीय केंद्र, कोच रूम, कॉन्फरन्स हॉल तसेच प्रसाधनगृह, खेळाडूसाठी चेंजिंग रूम असणार आहे. इमारतीच्या बाजूला मैदानात बॉक्स क्रिकेट, पिकेल बॉल व व्हॉलिबॉलसाठी मैदानाची निर्मिती करण्यात येणार आहे.

> विविध खेळाच्या आधुनिक सुविधांसह मदनलाल धिंग्रा मैदानातील नवीन क्रीडा संकुलाची निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच कामास सुरुवात होणार आहे. क्रीडा संकुलाचे काम सुरु असताना मैदान नागरिकांसाठी खुले राहणार आहे.
>
> - मनोज सेठिया, सह शहर अभियंता, स्थापत्य -उद्यान क्रीडा, महापालिका

> परिसरातील सर्वात चांगले व मोठे मैदान म्हणून मनदनलाल धिंग्रा मैदानाचा नावलौकीक आहे. अनेक चांगले खेळाडू मैदानाने पिंपरी चिंचवड शहराला दिले आहेत. परिसरातील मुलांना पोलीस व आर्मी भरतीच्या सरावासाठी एक सोईचे मैदान म्हणून हे मैदान प्रचलित झाले आहे.
>
> - अजित दिवेकर, नागरिक

# शेती सिंचनासाठी उन्हाळी हंगामात प्रत्येकी दोन आवर्तने

## सणसर जोड कालव्याला आराखड्यात तरतूद केल्याप्रमाणे पाणी सोडण्यात यावे, ते 22 गावांना शेती सिंचनासाठी देण्यात यावे

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील सणसर जोड कालव्याला खडकवासला प्रकल्पाच्या मंजूर पाणी वाटपातील तरतुदीनुसार पाणी सोडणे बंधनकारक असून या सणसर जोड कालव्याला आराखड्यात तरतूद केल्याप्रमाणे पाणी सोडण्यात यावे. ते 22 गावांना शेती सिंचनासाठी देण्यात यावे, अशी आग्रही मागणी राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली.

पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या व जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची बैठक पार पडली. इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती सिंचनासाठी उन्हाळी हंगामात खडकवासला कालव्याला दोन व नीरा डाव्या कालव्याला दोन आवर्तने देण्याचा निर्णय, कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे क्रीडा व अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



### खडकवासलाचे आवर्तन

» यावेळी खडकवासला कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी 18 फेब्रुवारीपासून आवर्तन सुरू करण्यात आले आहे. हे आवर्तन संपल्यानंतर शेतकऱ्यांच्या हितासाठी येत्या 25 एप्रिलपासून दुसरे आवर्तन देण्यात यावे. अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांच्या हितासाठी भरणे यांनी या बैठकीत केली. ही मागणी विचारात घेऊन दुसरे आवर्तन येत्या 25 एप्रिल पासून सुरू करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना दिले.

तर निरा डावा कालव्यातून इंदापूरच्या शेती सिंचनासाठी उन्हाळी हंगामात दोन आवर्तने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार निरा डाव्या कालव्याला 11 मार्च ते 3 मे या कालावधीत 54 दिवसाचे उन्हाळी हंगामातील पहिले तर 4 मे ते 26 जून या कालावधीत 54 दिवसाचे दुसरे उन्हाळी हंगामातील आवर्तन शेती सिंचनासाठी दिले जाणार आहे.

यावेळी श्री भरणे यांनी या बैठकीत सणसर जोड कालव्याला खडकवासला प्रकल्पाच्या मंजूर पाणी वाटपातील तरतुदीनुसार पाणी सोडणे बंधनकारक असून या सणसर जोड कालव्याला आराखड्यात तरतूद केल्याप्रमाणे पाणी सोडण्यात यावे. व ते 22 गावांना शेती सिंचनासाठी देण्यात यावे अशी आग्रही मागणी या बैठकीत केली.

खडकवासला व नीरा डावा दोन्ही कालव्याला पूर्ण क्षमतेने पाणी सोडण्यात यावे. तसेच जास्तीत जास्त काळ इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती सिंचनासाठी आवर्तन द्यावे. तसेच तरंगवाडी तलावाच्या पाण्यावर इंदापूर शहर व अनेक गावच्या पाणी पुरवठा योजना अवलंबून आहेत. त्यामुळे या तलावात पाणी सोडण्यात यावे. अशी मागणी या बैठकीत मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. यावर पाणी परिस्थिती पाहून सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांनी दिले.

दापूर तालुक्यातील शेती सिंचनासाठी खडकवासला व निरा डाव्या कालव्यातून यावर्षी प्रत्येकी दोन उन्हाळी हंगामासाठी आवर्तने सोडली जाणार असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे यांची दिली. खडकवासला कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं भरणे यांनी सांगितले आहे.

### नीरा डावा कालव्याचे आवर्तन

» नीरा डावा कालव्यातून इंदापूरच्या शेती सिंचनासाठी उन्हाळी हंगामात दोन आवर्तने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार निरा डाव्या कालव्याला 11 मार्च ते 3 मे या कालावधीत 54 दिवसाचे उन्हाळी हंगामातील पहिले तर 4 मे ते 26 जून या कालावधीत 54 दिवसाचे दुसरे उन्हाळी हंगामातील आवर्तन शेती सिंचनासाठी दिले जाणार आहे.

# शिक्रापुरात अतिक्रमण कारवाईला अल्पविराम, न्यायालयात याचिका दाखल

## पुणे न्यायालयात याचिका दाखल केल्याने सुनावणी व त्यावरील निकाल होईपर्यंत कारवाई न करण्याच्या विनंतीनुसार कारवाई थांबविल्याचे स्थानिकांनी सांगितले

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्रापूर (ता. शिरुर) येथे पुणे अहिल्यानगर महामार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी आलेल्या पीएमआरडीएच्या अधिकारी कारवाई न करताच परत फिरले. याप्रकरणी पुणे न्यायालयात याचिका दाखल केल्याने सुनावणी व त्यावरील निकाल होईपर्यंत कारवाई न करण्याच्या विनंतीनुसार कारवाई थांबविल्याचे स्थानिकांनी सांगितले तर वरिष्ठांच्या सुचनेनुसार पीएमआरडीए व सार्वजनिक बांधकाम खात्याकडून कारवाई प्रस्तावित असल्याचे प्रशासनाचे वतीने सांगण्यात आले आहे.

सणसवाडी येथे दि. ११ व १२ फेब्रुवारी रोजी तर शिक्रापुरात दि. १३ फेब्रुवारी रोजी पीएमआरडीए व सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन्ही खात्यांच्या संयुक्त कारवाईत महामार्गाला अडसर ठरलेल्या अनेक टपऱ्या, अतिक्रमित शेड काढण्यात आली. यावेळी काही स्थानिकांनी विरोध केल्याने चालू कारवाई थांबवून नंतर करण्याचे ठरले. त्यानुसार पीएमआरडीए व बांधकाम खात्याने पुन्हा कारवाईसाठी शिक्रापुरात एंट्री करताच स्थानिकांनी याप्रकरणी पुणे न्यायालयात दावा दाखल केल्याची माहिती दाखविली.




न्यायालयाचा जो काही निकाल लागेल, तो आम्हाला मान्य असल्याचे लेखी निवेदन दिले. पत्रावर पीएमआरडीए व बांधकाम विभाग या खात्यांच्या वतीने अभियंता दीपक माने, सागर जाधव, गणेश जाधव, तेजस मदने, ऋतुराज सोनवणे यांनी सह्या केल्या. स्थानिकांचे वतीने ग्राहक पंचायतचे देवेंद्र सासवडे, सतीश सासवडे, संतोष चौरासिया, संतोष भुजबळ, सुरेश खुर्पे, प्रवीण सासवडे, वसंत जकाते, उमेश भुजबळ, उत्तम सासवडे, रमेश घाडगे यांनी सह्या केल्या. कारवाई थांबविण्यात आली. मात्र, पुढे काय घडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुणे न्यायालयात याचिका दाखल केल्याने सुनावणी व त्यावरील निकाल होईपर्यंत कारवाई न करण्याच्या विनंतीनुसार कारवाई थांबविल्याचे स्थानिकांनी सांगितले तर वरिष्ठांच्या सुचनेनुसार पीएमआरडीए व सार्वजनिक बांधकाम खात्याकडून कारवाई प्रस्तावित असल्याचे प्रशासनाचे वतीने सांगण्यात आले आहे. पीएमआरडीए कार्यान्वित २०१५ पासून झाली असेल तर जुन्या लोकांनी करायचे काय त्यामुळे न्यायालय याबाबत जो निर्णय देईल, त्यानुसार आम्ही ऐकू, असे अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे देवेंद्र सासवडे यांनी सांगितले.

### नीरा डावा कालव्याचे आवर्तन

» शिक्रापूर येथे ज्या ठिकाणी प्रशासन कारवाई करायची म्हणत आहेत. त्या रस्त्याचे भूसंपादन नाही. त्याची नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांना दिलेली नाही. ज्या टपऱ्या उभ्या आहेत. त्या ३० ते ४० वर्षांपासून उभ्या आहेत. पीएमआरडीए कार्यान्वित २०१५ पासून झाली असेल तर जुन्या लोकांनी करायचे काय त्यामुळे न्यायालय याबाबत जो निर्णय देईल, त्यानुसार आम्ही ऐकू, असे अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे देवेंद्र सासवडे यांनी सांगितले.

### वरिष्ठ निर्णय घेतील त्यानुसार कारवाई होईल : गणेश जाधव

» शिक्रापूर महामार्गावरील अतिक्रमण कारवाईबाबत वरिष्ठांच्या सुचनेनुसार कारवाई थांबविली असून वरिष्ठ पुढील सूचना देतील त्यानुसार कारवाई केली जाईल, असे पीएमआरडीए पुणेचे अभियंता गणेश जाधव यांनी सांगितले..